# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५ फॅक्स: २२१६ ३९७६
ई-मेल : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in
संकेतस्थळ : www.merc.gov.in / www.mercindia.org.in


जाहिरात क्र. १३/२०१७-१८

## जाहीर सूचना

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. न्युफाऊन्ड प्रॉपर्टीज् ॲण्ड लिजिंग प्रा. लि. च्या एमआयडीसी ट्रान्स-ठाणे क्रीक इण्डस्ट्रीयल एरिया, जिल्हा - ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१८ वर जनतेकडून अभिप्राय मागविण्याबाबत**

मे. न्युफाऊन्ड प्रॉपर्टीज् ॲण्ड लिजिंग प्रा. लि. यांना भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाकडून विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) अधिनियम, २००५ अंतर्गत एमआयडीसी ट्रान्स-ठाणे क्रीक इण्डस्ट्रीयल एरिया, जिल्हा - ठाणे येथील विशेष आर्थिक क्षेत्राकरिता विकासक म्हणून घोषित करण्यात आले आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ (बी) सह एसईझेड अधिनियम, २००५ च्या कलम ४(१) नुसार, मे. न्युफाऊन्ड प्रॉपर्टीज् ॲण्ड लिजिंग प्रा. लिमिटेड हे, भारत सरकारच्या एसईझेड अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एसईझेड क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेचे संचालन आणि देखभाल करण्याकरिता, एक मानीव वीज वितरण परवानाधारक आहेत. आयोगाने, सन २०१७ च्या प्रकरण क्र. ८० मध्ये दि. २ फेब्रुवारी, २०१८ रोजी दिलेल्या आदेशान्वये मे. न्युफाऊन्ड प्रॉपर्टीज् ॲण्ड लिजिंग प्रा. लि. यांच्या मानीव वितरण परवानाधारकाच्या दर्जास पुष्टी दिली आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १६ अंतर्गत, आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. न्युफाऊन्ड प्रॉपर्टीज् ॲण्ड लिजिंग प्रा. लि. च्या एमआयडीसी ट्रान्स-ठाणे क्रीक इण्डस्ट्रीयल एरिया, जिल्हा - ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१८ चे प्रारुप तयार केले आहे. या प्रारुप विनियमांची प्रत आयोगाच्या **www.mercindia.org.in** / **www.merc.gov.in** या संकेत-स्थळांवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. उपरोक्त प्रारुपावर अभिप्राय, सूचना किंवा हरकती (१+५ प्रतींमध्ये), सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५, किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्स-०२२-२२१६३९७६; ई-मेल : **mercindia@merc.gov.in**) द्वारा या पत्त्यावर **दि. २७ मार्च, २०१८ रोजी किंवा त्यापूर्वी** मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

या दिनांकापर्यंत प्राप्त झालेल्या सर्व प्रतिक्रिया आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

**सही/-**
**सचिव**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**मुंबई**
**दिनांक : २७ फेब्रुवारी, २०१८**